REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख २४ जानेवारी, १९४० अंक ४

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

### दुसरी आवृत्ति १ फेब्रुवारी रोजीं प्रसिद्ध होणार

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकासहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

अप-टु-डेट शिलाईकरितां

## महिंद्रकर ब्रदर्स

यांचेकडे चौकशी करा.

बुधवार चौक, पुणें

१२ तासांत कपडे शिवून मिळतील.

खादी भांडाराचे माडीवर

# विविध माहिती

### पेट्रोलवरील करापासून २ लक्ष रुपये

कलकत्ता म्युनिसिपॅलिटी पेट्रोलवर कर बसविण्याच्या विचारांत आहे. त्या करास सरकारनें मान्यता दिल्यास म्युनिसिपॅलिटीचें वार्षिक उत्पन्न २ लक्ष रुपयांनीं वाढेल.

### हिंद-जपान व्यापारी बोलणीं

हिंद–जपान व्यापारी वाटाघाटींस प्रारंभ होऊन ४ महिने झाले. अद्याप त्यांत कांहींहि प्रगति झालेली नाहीं.

### हिंदी सरकारी रेल्वेजचें उत्पन्न

एप्रिल ते डिसेंबर या १९३९ च्या नऊ महिन्यांत हिंदी सरकारी रेल्वेजचें उत्पन्न ७० कोटि, ९१ लक्ष रुपये झालें. याच काळांतील १९३८ चें उत्पन्न ६९ कोटि, ४९ लक्ष रुपये होतें.

### ब्रिटिश रेडिओंची निर्गत

युद्धकालीन बातम्यांच्या महत्त्वामुळें रेडियोस मागणी सर्वत्र वाढत्या प्रमाणावर आहे. १९३८–३९ मध्यें ऐंशी हजार रेडिओ सेट्स ब्रिटननें परदेशीं पाठविले. त्यांपैकी पन्नास हजार सेट्स ब्रिटिश साम्राज्यांतील देशांनींच घेतले. दीड लाखांवर सेट्स उत्पादन करण्याची प्रचंड योजना १९४०–४१ करितां ग्रेट ब्रिटनमध्यें आखण्यांत आलेली आहे.

### हवामानाप्रमाणें रेडिओंची योजना

निरनिराळ्या देशांतील हवामानास अनुसरून रेडिओ सेट्स बनविले जावेत ह्या उद्देशानें एका ब्रिटिश इंजिनिअरनें हिंदुस्थान, सयाम, न्यूझीलंड, हवाई बेटें व कॅनडा या देशांतून ५६ हजार मैलांची सफर केली.

### हिंदुस्थानांत रेडिओंची आयात

हिंदुस्थानांत रेडिओंची आयात वाढत्या प्रमाणावर होत असल्याचें दिसून येतें. रेडियो वगैरेच्या आयातीवरील जकातींचें उत्पन्न १९३८ मध्यें १४ कोटि, ८४ हजार रुपये झालें; १९३९ मध्यें हें उत्पन्न १९ कोटि, २० हजार रुपये झालें.

### युद्ध आणि कामगारांचें आरोग्य

ग्रेट ब्रिटनमधील कारखान्यांतील कामगारांचें आरोग्य युद्ध परिस्थितीमुळें कमी झालें असल्याचें आढळून आलें आहे. दीर्घ काळ काम करावें लागण्याचा हा परिणाम आहे.

### लँकेशायरच्या कापडाचा निर्गत व्यापार

सप्टेंबर, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर ह्या तीन महिन्यांत ब्रिटिश कापडाचा खप प्रत्यक्ष ग्रेट ब्रिटनमध्यें आणि ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांत, दक्षिण अमेरिकेंत, वेस्ट इंडीजमध्यें, पश्चिम आफ्रिकेंत, उत्तर आणि पश्चिम युरोपांत व मलायांत मोठ्या प्रमाणावर झाला. परंतु, हिंदुस्थानानें मात्र फारच थोडा माल घेतला. नोव्हेंबर अखेर हिंदुस्थानांतून थोडी-फार मागणी येऊं लागली होती.

### रस्त्यांवरील अपघातांत वाढ

सध्या ग्रेट ब्रिटनमधील शहरांतून रात्रीचे वेळीं अंधार राखण्यांत येतो, त्यामुळें रस्त्यांवरील अपघातांत फार मोठी वाढ झाली आहे. युद्धास प्रारंभ झाल्यापासून तीन महिन्यांचे मुदतींत अशा अपघातांत २,९७५ लोक मृत्युमुखीं पडले; १९३८ च्या तत्सम तीन महिन्यांतील आकड्यापेक्षा हा आकडा १,१९७ नें मोठा आहे. रस्त्यांवरील वहानांची संख्या आतां बरीच कमी झालेली आहे, ही गोष्ट ध्यानांत घेतां अपघातांची वाढ अधिकच चिंताजनक वाटते.

### नोबेल बक्षिसें

आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या पांच नोबेल बक्षिसांचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. हीं पांच बक्षिसें सहा शास्त्रज्ञांत विभागलेलीं असून त्यांतील तिघेजण जर्मन आहेत. जर्मन शास्त्रज्ञांस हीं बक्षिसें स्वीकारण्याची तेथील सरकारनें बंदी केली आहे.

### बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

वरील कंपनीची तहकूब झालेली साधारण सभा रविवार ता. २१ जानेवारी, १९४० रोजीं कॉमनवेल्थ इमारतींत भरली होती. कंपनीचा वार्षिक रिपोर्ट आणि ताळेबंद ह्यांस सभेनें एकमतानें मंजुरी दिली आणि डायरेक्टरांची निवडहि निवडणुकीचें कारण न पडतां झाली. निवृत्त ऑडिटर्स पुढील वर्षाकरितां पुनः नेमण्यांत आले.

### हिंदी विद्यार्थ्यांची ग्रेट ब्रिटनमध्यें शिक्षणाची सोय

डायरेक्टर जनरल ऑफ इंडिया, स्टोअर डिपार्टमेंट ह्यानें ग्रेट ब्रिटनमध्यें शिक्षणासाठीं जाणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांस इंजिनिअरिंगच्या वेगवेगळ्या शाखांबाबत प्रत्यक्ष अनुभव मिळवून देण्याची व्यवस्था केली. प्रवेशेच्छू उमेदवारांची संख्या १७४होती. ९७ उमेदवारांची योग्य ती सोय करण्यांत आली.

### बी. इ. एस. अँन्ड टी. कं. लि.

बॉंबे इलेक्ट्रिक सप्लाय अँन्ड ट्रॅम्वेज् कंपनीस डिसेंबर, १९३९ मध्यें वीज पुरवठ्यापासून ७ लक्ष, ३६ हजार रुपये आणि ट्रॅमगाड्या आणि बसेस ह्यांपासून ७ लक्ष, ३१ हजार रुपये उत्पन्न मिळालें.

### ४½ फुटांखालील मुलांस निम्मा दर

चीनमधील रेल्वेजचे कंडक्टर आपल्याबरोबर नेहमी फुटपट्टी बाळगतात, ह्याचें कारण चीनमध्यें मुलांस रेल्वे भाडें आकारावयाचें, तें त्यांच्या उंचीवर अवलंबून असतें. २ फूट, ६ इंचांखालील मुलांस आकार पडत नाहीं, ४ फूट, ४ इंचांपर्यंतच्या मुलांस निम्मा दर पडतो आणि त्यापेक्षा उंच मुलांस पुरा आकार द्यावा लागतो.

### कॅरट

एके काळीं कॅरट बीं हें सोनें आणि चांदी मोजण्यासाठी उपयोगांत आणलें जात असे आणि कॅरट आतां एखाद्या वस्तूंतील शुद्ध सोन्याचा भाग दर्शवितें. २२ कॅरट सोनें ह्याचा अर्थ वस्तूच्या २४ भागांपैकी २२ भाग सोनें असून बाकीचा भाग इतर धातूंचा आहे; १८ कॅरट सोनें म्हणजे वस्तूच्या २४ भागांपैकी १८ भाग सोनें आहे.

### ग्रेट ब्रिटनमधील कोळी

ग्रेट ब्रिटनमधील मच्छीमारीचा धंदा बऱ्याच अंशीं अडला असल्यामुळें अनेक कोळी लोक बेकार झाले आहेत. मासे पकडणाऱ्या १,२०० बोटींपैकी ९०० बोटी सरकारनें आपल्याकडे घेतलेल्या आहेत, त्या पाणसुरुंग शोधण्याचें आणि त्यांचा प्रतिकार करण्याचें काम करतात त्यांवर कांहीं लोकांस नोकरी आहे. बाकीचे रिकामे आहेत.

### कायद्याचा सल्ला देण्याचा छंद

ग्रेट ब्रिटनमध्यें नॉरफोक परगण्यांत मि. लेस्ली स्मिथ नांवाचा एक गृहस्थ आहे तो कायद्याचा सल्ला इतरांस मोफत देतो. गेल्या ३० वर्षांत त्यानें १५ हजार लोकांस असा सल्ला दिला आहे. कायद्याचीं पुस्तकें वाचण्याचा त्यास नाद होता, त्याचा उपयोग करण्यासाठीं त्यानें मोफत सल्ला देण्यास प्रारंभ केला आणि ही पद्धति त्यानें पुढें चालू ठेवली. गेलीं १५ वर्षे तो बेकार असून बेकारीच्या सरकारी तनख्यावर संसार करीत आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ३८ |
| २ बँकिंगच्या नवीन कायद्याची योजना ... | ३९ |
| ३ स्फुट विचार<br>हिंदुस्थानावर युद्धाचे परिणाम—बाजारभाव आणि डॉ. ग्रेगरी—श्री.मनु सुभेदार ह्यांचा अभिप्राय-शिक्षणाचा व्याप | ४० |
| ४ लोकसंख्या आणि रहाणीचें मान ... ... | ४२ |
| ५ शिवणकामाच्या दुकानावर निर्बंध घालण्याची आवश्यकता ... ... | ४३ |
| ६ ब्रिटिश हिंदुस्थानांतील बिगर-शेड्यूल्ड बँका | ४४ |
| ७ ठाणें मुंबई उपनगर लँड मॉर्गेज बँक ... | ४५ |
| ८ युद्धामुळें मालाच्या किंमतींत आणि उत्पादनांत वाढ | ४५ |
| ९ जपानमधील आर्थिक परिस्थिति ... ... | ४६ |
| १० पोस्टल सेव्हिंग बँकांचे नवीन नियम ... | ४६ |
| ११ निवडक बाजारभाव | ४७ |


# अर्थ

बुधवार. ता. २४ जानेवारी १९४०

## बँकिंगच्या नवीन कायद्याची योजना

### रिझर्व्ह बँकेनें तयार केलेला मसुदा

इंडियन कंपनीज ॲक्टानें हिंदुस्थानांतील जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या कारभाराचे बाबत कायद्यांत सुधारणा घडवून आणली आणि विमा कायद्यानें हिंदी विमा कंपन्यांचे व्यवहार नियंत्रित करून विमेदारांच्या हितसंरक्षणाची प्रभावी तरतूद केली. हे दोन्ही कायदे अंमलांत आलेले असून अव्यवस्थित विमा कंपन्यांचें अस्तित्व ह्यापुढें कठीण होणार आहे. कंपन्यांच्या भागीदारांचें आणि विमेदारांचें हित या दोन कायद्यांनीं शक्य तेवढें साधण्याचा यत्न केला आहे. बँकिंग कंपन्यांचे व्यवहार नियंत्रित करण्यासाठीं एका खास कायद्याची आवश्यकता आहे, ह्या संबंधीं सर्वांची आज कित्येक वर्षे एकवाक्यता होती; तथापि, त्याविषयीं कायदा करण्याचें काम अत्यंत बिकट असल्याकारणानें तें एकसारखें लांबणीवर पडत गेलें. कंपनी कायद्यांत नुकतीच सुधारणा करण्यांत आली, त्यावेळीं त्या कायद्यांतील कांहीं कलमें दुरुस्त करून आणि कांहींची भर घालून बँकिंग कंपन्यांचे व्यवहारावर कांहीं बंधनें घातलीं गेलीं, त्यास अद्याप दोनतीन वर्षेंहि लोटलेलीं नाहींत. तथापि, ह्या अल्प मुदतीमध्यें हिंदी बँकिंग क्षेत्रांत, विशेषत: दक्षिण हिंदुस्थानांत, उडालेला गोंधळ, अनेक लहान बँकांनीं बँकिंग संबंधींचा कायदा आपणांस लागू नसल्याचें सांगून चालविलेले धोक्याचे व्यवहार, प्रांतिक सरकारांनीं पास केलेले कर्जनिवारक कायदे आणि त्यांचा लहान बँकांवर होणारा परिणाम, शेड्यूल्ड बँकांच्या यादींत समाविष्ट होण्याकरितां कांहीं बँकांनीं केलेली घाई, अव्यवस्थित बँकांची परिस्थिति बिघडूं न देण्यासाठी पुरेशा तरतुदींचा कंपनी कायद्यांत अभाव, इत्यादि कारणांमुळें बँकिंगविषयक व्यापक कायदा करण्याचें काम सत्वर हातीं घेणें इष्ट आहे, असें रिझर्व्ह बँकेचें मत झालें आणि त्यास अनुसरून बँकेनें त्या संबंधांत कायद्याचा एक मसुदा तयार केला, तो प्रसिद्ध झाला आहे. हिंदुस्थानांतील लोकांनीं आपली बचत पडून ठेवण्याऐवजी ती त्यांनीं बँकांकडे ठेवली, तरच हिंदी आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीस जोराची चालना मिळेल, हें उघड आहे. कारण, बँकांजवळील पैसा व्यापाराच्या व उद्योगधंद्यांच्या वाढीस सहायकारक होतो. तथापि, बँकांकडे ठेवलेला पैसा ह्या अत्यंत सुरक्षित असून ठराविक अटींस अनुसरून तो आपणांस परत मिळेल अशी ठेवीदारांची खात्री पटली, तरच लोक बँकांमध्यें ठेवी ठेवण्यास प्रवृत्त होतील, हें उघड आहे. ठेवीदारांचें हितसंरक्षण प्रथम केलें पाहिजे आणि त्यावरच बँकिंग कायद्याची उभारणी केली पाहिजे, ह्या तत्त्वास रिझर्व्ह बँकेनें प्राधान्य दिलें आहे, हें उचितच आहे. बँक म्हणून किफायतशीरपणें काम करणाऱ्या संस्थेचे व्यवहार कांहीं किमान विशिष्ट प्रमाणावर चालणें आवश्यक आहे, बँकेचे पैसे गुंतविण्यावर कांहीं नियंत्रण पाहिजे आणि बँक बंद पडलीच तर ठेवीदारांच्या वांटणीचे पैसे त्यांस शक्य तितक्या लवकर मिळाले पाहिजेत, ह्या दृष्टीनेंच कायद्याच्या मसुद्याची योजना केलेली आहे.

वरील सुधारणा बँकिंग ॲक्टांत समाविष्ट करण्यासाठी प्रथम "बँक," "बँकिंग कंपनी" इत्यादींची व्याख्या कंपनी कायद्यांत करण्यांत आली आहे, त्यापेक्षा आतां अधिक स्पष्ट शब्दांत ती केलेली आहे. करंट अकाउंटमधून अगर अन्य मार्गानें चेकनें काढतां येण्याजोग्या ठेवी स्वीकारणें म्हणजे बँकिंग अशी नवीन व्याख्या करण्यांत आली आहे. चेकच्या उपयोगास प्राधान्य देण्यांत आलें असून एकादी संस्था ही बँक आहे किंवा नाहीं, ह्याविषयीं ह्यापुढें संदेह रहाणार नाहीं, अशी त्यामुळें सोय झालेली आहे. नियोजित कायदा सहकारी बँकांस लागू पडणार नाहीं. तथापि, शहरांतील लहानसहान अर्बन बँका जॉइंट स्टॉक बँकांचें कार्य आज करीत आहेत, त्यांचे व्यवहार जॉइंट स्टॉक बँकांच्या कायद्याप्रमाणेंच नियंत्रित केले जाणें आवश्यक आहे, अशी सूचना पुढें आल्यावांचून रहाणार नाहीं. सहकारी बँकांच्या व्यवहाराच्या नियमनाबाबत स्वतंत्र नियंत्रणाची व कायदेशीर व्यवस्था आहे, आणि रिझर्व्ह बँकेनें आपल्या एका पत्रकांत, सहकारी संस्थांनीं आपले व्यवहार व्यापारी बँकांच्या व्यवहाराप्रमाणेंच कसोशीनें आणि तत्परतेनें चालवावे, असें म्हटलें आहे. दुरुस्त झालेल्या कंपनी कायद्यास अनुसरून सहकारी बँकांनीं आपल्या व्यवहार-पद्धतींत कित्येक सुधारणा केल्या आहेत. त्याचप्रमाणें नियोजित बँकिंगच्या कायद्यांतली कांहीं कलमें स्वत:स लागू करून घेणें व्यावहारिक व श्रेयस्कर आहे काय ह्याचा विचार सहकारी बँकांची प्रातिनिधिक संस्था करील ह्यांत शंका नाहीं. एक लक्ष रुपयांपेक्षा कमी भरणा झालेलें भांडवल असलेल्या बँकिंग कंपनीस व्यवहारास ह्यापुढें प्रारंभच करतां येणार नाहीं आणि शहराच्या वस्तीप्रमाणें व्यवहाराचे प्रत्येक ठिकाणाबाबत तिला कांहीं किमान भरणा झालेलें भांडवल जमवावें लागेल. कित्येक बँका अधिकृत भांडवलापैकीं अत्यंत लहान अंश जमा करतात, आणि अधिकृत भांडवलाच्या मोठ्या रकमेच्या आकड्याचा जाहिरातीसाठी उपयोग करतात. अधिकृत भांडवलापैकीं निदान निम्में भांडवल तरी खपलें पाहिजे, अशी नवीन कायद्यांचे मसुद्यांत तरतूद आहे. खपलेल्या भांडवलापैकी निम्में तरी वसूल झालें पाहिजे, अशीहि त्यांत अट आहे. ह्या तजविजीविरुद्ध तक्रारीस जागा दिसत नाहीं. ह्या अटी पार पाडण्यासाठी बँकांस दोन वर्षांची मुदत मिळावी अशी रिझर्व्ह बँकेची सूचना आहे.

बँकांचे पैसे तरते रहावे ह्यासाठी त्यांनी आपल्या जिंदगीपैकी निदान ३०% रकम ट्रस्ट ॲक्टांत नमूद केलेल्या रोख्यांत धारण करावी, अशी रिझर्व्ह बँकेची सूचना आहे. चांगल्या बँका ह्याप्रमाणें आजहि करीत आहेत आणि हिंदुस्थानांत काम करणाऱ्या विदेशी बँकांसहि हा नियम लागू करण्यांत यावा, अशी तिची शिफारस आहे. चांगल्या बँका साधारणपणें आपल्याजवळील रोख्यांपैकी निम्म्यापेक्षा अधिक रोखे अल्प मुदतीच्या रोख्यांत अगर ट्रेझरी बिलांतच गुंतवितात, कारण त्यांच्या बाजारभावांतील चढउतारास थोडी-फार मर्यादा असते. ह्यासंबंधांत कांहीं नियम सुचविणें रिझर्व्ह बँकेस आवश्यक वाटलें नाहीं. हे रोखे बँकांनीं कोठेंहि गहाण ठेवतां कामा नयेत, परंतु अडी-अडचणीचे प्रसंगीं कायद्याची कठोरता कमी करण्याचा सरकारास अधिकार असावा अशी रिझर्व्ह बँकेची सूचना आहे.

लिक्विडेशनमध्यें गेलेल्या त्रावणकोर नॅशनल ॲन्ड क्विलॉन बँकेकडील बहुतेक सर्व ठेवी ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांच्या होत्या, परंतु तिनें आपल्या जिंदगीचा मोठा अंश संस्थानी हद्दींत गुंतविला होता, त्यामुळें कोर्टांच्या अधिकार-मर्यादेचे बिकट प्रश्न उपस्थित झाले. ही अडचण पुनः येऊं नये, ह्याकरितां रिझर्व्ह बँकेनें अशी सूचना केलेली आहे कीं, अशा ठेवींपैकी शेकडा ७५% इतकी तरी रकम तेथेंच गुंतविण्यांत यावी. बँकांच्या लिक्विडेशनच्या संबंधांत सध्याचा कायदा अत्यंत अपुरा असल्याचें आढळून आलें असून त्याबाबतहि रिझर्व्ह बँकेनें महत्त्वाच्या सुधारणा सुचविल्या आहेत.

नियोजित कायद्याची आवश्यकता सर्वांस मान्य असून, रिझर्व्ह बँकेनें तयार केलेल्या मसुद्याचे मुख्य तत्त्वांबाबतहि कोणाचा विरोध येण्याचा संभव नाहीं. तथापि, लहान बँकांच्या वाढीस वाव ठेऊन त्यांची प्रगति चांगल्या तऱ्हेनें होईल, अशीहि तरतूद कायद्यांत होणें आवश्यक आहे. गरीब आणि निर्धन हिंदुस्थानांतील प्रमुख शहरें सोडलीं तर बाकीच्या ठिकाणीं बँकांचा आकार लहानच राहणें अपरिहार्य आहे. बँक ही संस्था मजबूत आणि टिकाऊ होऊन ठेवीदारांचें हितसंरक्षण होणें इष्ट आहे. त्याचप्रमाणें, नवीन बँकांच्या स्थापनेस आडकाठी येणार नाहीं, ह्याकरितां भागीदारांसहि थोडें-फार आकर्षण रहाणें आवश्यक आहे. महाराष्ट्रांत आज ज्या बँका चालू आहेत त्यांपैकी कित्येकांस नवीन अटी पाळणें कठीण होणार आहे. ह्या दृष्टीनें महाराष्ट्रांतील बँकांच्या प्रतिनिधींची एक लहानशी परिषद भरवून ह्या बाबतींत विचारविनिमय करण्याचें मराठा चेंबरनें ठरविलें आहे, असें समजतें. हा उपक्रम स्तुत्य आहे.

---

### इनकमटॅक्स बाबत एक निवाडा

शर्यतीवरील जुगारांत झालेलें नुकसान प्राप्तीवरील कराच्या आकारणी बाबत प्राप्तीमधून वगळतां येईल काय ?

शर्यतीवर जुगार खेळणें हा एखाद्याचा व्यवसाय समजून त्यांत येणारें नुकसान एकूण प्राप्तीमधून वजा करून उरलेल्या प्राप्तीवरच इनकमटॅक्स बसविला पाहिजे काय ? असा प्रश्न अलाहाबाद हायकोर्टांत नुकताच उपस्थित झाला, त्याचा तीन न्यायमूर्तींच्या बेंचानें एकमतानें निवाडा करून रेस खेळण्यांत येणारें नुकसान प्राप्तीमधून उणें करतां येत नाहीं असा निकाल दिला.

## स्फुट विचार

### हिंदुस्थानावर युद्धाचे परिणाम

बाजारभावांत वाढ आणि समाजांतील उत्पादक, उपभोगक व कामकरी इत्यादि वर्गांवर होणारा तिचा विषम परिणाम ह्या गोष्टी युद्धाच्या परिस्थितींत अंगभूत आहेत आणि त्यांचा अनुभव लोकांस येत आहे. किंमती चढल्या म्हणजे देवघेवींच्या व्यवहारास अधिक पैसा लागतो आणि समाजांत खेळणाऱ्या चलनाच्या प्रमाणांत विस्तार होतो. हिंदी चलनावर युद्धाचा काय परिणाम झाला आहे त्याचा विचार केला असतां असें दिसून येतें कीं हिंदुस्थान व ब्रह्मदेश मिळून गेल्या चार महिन्यांत चलनी नोटांमध्यें ५४ कोटि रुपयांची भर पडली आहे आणि रुपयांचें नाणें ११ कोटि अधिक खेळत आहे. म्हणजे चार महिन्यांत ६५ कोटि रुपयांनीं हिंदी चलन व्यवहारांत वाढलें आहे. हिंदी बाजारभाव चढल्या कारणानें येथील माल देशाबाहेर पाठविणाऱ्या व्यापाऱ्यांच्या आणि त्याचें उत्पादन करणारांच्या हातीं अधिक चलन खेळत आहे. पण ह्या निर्गत केल्या जाणाऱ्या मालाची किंमत लंडनमध्यें पौंडांच्या स्वरूपांत मिळते. ह्या किंमतींत झालेल्या वाढीचा परिणाम परराष्ट्रीय व्यापारास पैसा पुरवणाऱ्या बँकांच्या लंडनमधील शिलका वाढण्यांत होतो आणि रिझर्व्ह बँक ही त्यांची मध्यवर्ती बँक असल्यानें तिच्या लंडन येथील शिलका फुगतात. गेल्या चार महिन्यांत हिंदुस्थानच्या लंडन येथील शिलकेंत ४८ कोटि रुपयांचा वाढावा झालेला आहे. वाढलेल्या हिंदी बाजारभावाचा ह्या देशाच्या परराष्ट्रीय व्यापारावरहि दृश्य असा परिणाम झाला आहे; आणि तो म्हणजे निर्गत व्यापार आयात व्यापारच्या मानानें किंमतींच्या स्वरूपांत वाढला आहे. एप्रिल ते नोव्हेंबर ह्या आठ महिन्यांचे १९३८ चे व १९३९ चे आकडे पाहिले असतां असें दिसून येतें तें ह्या मुदतींतला निर्गत व्यापाराचा अनुकूल फरक अनुक्रमें करून २४ कोटि, ७० लक्ष आणि ३३ कोटि, ७० लक्ष असा होता. म्हणजे ९ कोटि रुपयांनीं निर्गत व्यापाराचा वाढावा झाला. ह्यांत सोनें-चांदीच्या व्यापाराची तफावत ३ कोटि रुपये होती.

---

### बाजारभाव आणि डॉ. ग्रेगरी

बाजारभावांत हिंदुस्थानामध्यें वाढ झाली आहे तिचें नियमन आणि त्यांतून उद्भवणाऱ्या प्रश्नांच्या निकालाचें महत्त्व ह्याकडे मध्यवर्ती व प्रांतिक सरकार ह्यांचें लक्ष लागलें आहे. ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारचे आर्थिक सल्लागार, डॉ. ग्रेगरी ह्यांनीं दिलेली माहिती व प्रदर्शित केलेले विचार ह्याकडे लक्ष देणें आवश्यक आहे. दिल्ली येथें रेडिओवर त्यांचें भाषण नुकतेंच झालें, त्यांत त्यांनीं असें सांगितलें कीं सप्टेंबरच्या प्रारंभाच्या भावानें शेतीच्या मालाच्या किंमती ३७ टक्यांनीं चढल्या आहेत आणि पक्क्या मालाच्या बाजारभावांत शेकडा ४२ इतकी वाढ झालेली आहे. खाण्याचे पदार्थ व तंबाखू ही शेकडा २५ नीं महाग झाली आहेत आणि इतर शेतीच्या मालाच्या किंमती शेकडा ८२ नीं चढल्या आहेत. सर्वसाधारण किंमतींतली वाढ ३७ टक्के आणि कच्चा मालांत २० टक्के हे आकडे येथें विशेष महत्त्वाचे आहेत. अनुकूल परिस्थितीचा फायदा करून घेण्याची व्यापाऱ्यांची स्वाभाविक प्रवृत्ति असते, तीच ह्या बाजारभावांच्या

वाढीच्या मुळाशीं आहे असें डॉ. ग्रेगरी ह्यांचें म्हणणें आहे, युद्धामुळें मालाचा पुरवठा मर्यादित होणें अपरिहार्य आहे. ह्या अपेक्षेनें व्यापाऱ्यांनीं किंमती चढवल्या आहेत आणि त्यांत नेहमींच्या व्यवहाराच्या पद्धतीपलीकडे विशेष कांहीं नाहीं. बाहेरून येणाऱ्या मालाच्या किंमती वाढण्याचीं, वहातुकीच्या दरांत वाढ झाली आणि कित्येक जातींच्या हिंदी मालास येणारी अनपेक्षित मागणी आली, हीं उघड कारणें आहेत असा डॉ. ग्रेगरी ह्यांचा युक्तिवाद आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मात्री पुरवठा व मागणी ह्यांच्या परस्पर संबंधाविषयींच्या व्यापाऱ्यांच्या कल्पना बाजारभावांच्या वाढीच्या मुळाशीं आहेत असा त्यांच्या म्हणण्याचा निष्कर्ष आहे. किंमतींचें नियंत्रण सरकारनें करावें ह्या सूचनेस अनुलक्षून त्यांनीं दोन गोष्टी प्रामुख्यानें पुढें मांडल्या. आपापल्या खास हितसंबंधास अनुसरून लोक ह्या बाबतींत परस्पर-विरुद्ध अशा शिफारसी करतात, ही एक गोष्ट आणि बाजारभावांचें नियंत्रण हें अत्यंत अवघड काम आहे ही दुसरी. किंमतींचें नियमन सरकारास सहज करतां येईल ह्या सामान्य कल्पनेच्या भ्रममूलकपणावर त्यांनीं विशेष जोर दिला. ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी दिल्ली येथें मध्यवर्ती सरकाराच्या विद्यमानें परिषद् भरणार आहे, तिच्याकडे लोकांचें लक्ष तूर्त लागलें आहे.

---

### श्री. मनु सुभेदार ह्यांचा अभिप्राय

अहमदाबाद येथील व्यापारी कॉलेजांत भाषण करतांना श्री. मनु सुभेदार यांनीं वरील विषयावर आपले विचार नुकतेच व्यक्त केले. हिंदुस्थानाच्या अनेक प्रांतांत व संस्थानांत बाजारभावांचें नियंत्रण तात्पुरत्या ह्या कामासाठीं नेमलेल्या कमिटीकडून होणें अवघड आहे आणि इंग्लंडमध्यें युद्धाप्रीत्यर्थ बेसुमार खर्च करावा लागत असल्यानें तेथें चलनाचा भलताच विस्तार होऊन किंमती भडकण्याची भीति आहे तशी ती ह्या देशांत नाहीं, कारण चलनासंबंधांतलें हिंदुस्थानांतलें धोरण चलनाचें आकुंचन करण्याचें आतापर्यंत राहिलें आहे असें ते म्हणाले. आज दुकानदारास चार पैसे अधिक मिळतात खरे, पण सध्याच्या किंमती उतरल्या म्हणजे चढीच्या दरानें खरेदी केलेला माल त्याच्यापाशी पडून राहील. त्याकरितां सरकारनें निश्चित केलेल्या किंमतीनें विकणाऱ्या दुकानदारांकरितां धान्याचे भाव ठरवून द्यावे आणि त्यांस मान्यता द्यावी, व याच घाऊक व्यापाराचे बाजारभाव जसजसे बदलतील तसतसे फेरफार दर आठवड्यास त्यांस बदलून द्यावे असें त्यांचें म्हणणें आहे. कित्येक प्रकारच्या मालाच्या घाऊक किंमती त्यास मागणी गिऱ्हाइकांकडून वाढली आहे म्हणून चढल्या नसून व्यापाऱ्यांनीं सट्टेबाजीनें वाढवल्या आहेत, असेंहि त्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानचा कच्चा माल युद्धपरिस्थितीमुळें बाहेर जाण्यास अडचण उत्पन्न झाली असून त्या योगानें बाजारभाव चढण्यास आळा बसेल. चढलेले वहातुकीचे व विम्याचे दरहि किंमती खेचून धरतील. ह्या परिस्थितींत हिंदी शेतकऱ्याच्या पदरांत चार पैसे अधिक पडत असतां त्यांत कृत्रिम रीतीनें अडथळा येईल असें सरकारचें नियंत्रणात्मक धोरण असूं नये. नाहीं तर, हिंदी कच्चा माल मुद्दाम स्वस्त करून बाहेर पाठवण्यांत येत आहे असा आरोप केला जाण्याची भीति आहे अशी सूचना श्री. सुभेदार ह्यांनीं केली. ज्यांची प्राप्ती मर्यादित आहे असे कामकरी व नोकर ह्यांची मजुरी व पगार योग्य प्रमाणांत वाढवण्यांत यावेत, परंतु वाढलेल्या किंमतींमुळें हिंदी उद्योगधंद्यांस मिळत असलेलें उत्तेजन निष्फळ होईल अशा रीतीनें त्यांचें नियंत्रण होऊं नये असें त्यांनीं प्रतिपादलें.

---

### शिक्षणाचा व्याप

शिक्षण घेणाऱ्या मुलामुलींच्या संख्येच्या बाबतींत हिंदुस्थानांत मुंबई प्रांताचा पहिला नंबर लागतो. १९३७-३८ सालीं ह्या प्रांतांत विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या संख्येचें एकूण लोकसंख्येशीं प्रमाण शेकडा ७⅚ इतकें होतें. मद्रासमध्यें हें प्रमाण ७⅓% होतें. मध्यप्रांत व वऱ्हाडचा नंबर शेवटचा लागला आणि त्यांतील प्रमाण ३⅓% होतें. सर्वांत अधिक विद्यार्थिनी बंगालमध्यें होत्या. त्यांचें शेकडा प्रमाण ६½ च्या वर असून विद्यार्थ्यांचें प्रमाण जवळ जवळ १० होतें. मुलांच्या प्रमाणांत मुंबईचा नंबर पहिला होता कारण त्यांचें प्रमाण ११ होतें. मुंबईत विद्यार्थिनींचें प्रमाण ४ पेक्षा कमी होतें ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. मद्रासमध्यें विद्यार्थी आणि विद्यार्थिनी ह्यांचें प्रमाण अनुक्रमें करून १०¼ व ४¼ होतें. मध्यप्रांत स्त्री–शिक्षणाचे संबंधांत अत्यंत मागसलेला असून तेथील विद्यार्थिनींचें प्रमाण १ हून थोडें अधिक होतें. शिक्षणावर मद्रासमध्यें सर्वांत अधिक खर्च होतो. त्याचा आकडा ५½ कोटि रुपये असून बंगालचा खर्च ५ कोटि रुपये होतो. खर्चाच्या आकड्यांची तुलना करतांना प्रांतांची लोकसंख्या हिशेबांत घेतली पाहिजे. तसें केलें असतां मुंबईचा नंबर वर लागेल. सबंद हिंदुस्थानचा विचार करतां असें दिसतें कीं १९३७-३८ सालीं एकूण लोकसंख्येपैकी शेकडा ५⅓ इतक्या प्रमाणांत विद्यार्थी व विद्यार्थिनी ह्यांची संख्या होती. विद्यार्थ्यांचें प्रमाण ८ पेक्षा थोडें कमी आणि विद्यार्थिनींचें २⅓ एवढें होतें. ब्रिटिश प्रांतांत त्या सालीं शिक्षणावर एकूण २७ कोटि रुपये खर्चण्यांत आले. म्हणजे दरवर्षी दर माणशीं एक रुपया पडला.

Capture the Market with your Publicity Campaign Through

**D. S. KATDARE & Co.**

*Advertising Agents & Consultants.*

*Press—Posters—Slides—Railways—etc.*

—Bombay Office—
Merwan Buildings
Sir Pherozshah Road Fort.
Telephone : : : 20805.

—Poona Office—
Laxmi Road,
Poona 2.

## लोकसंख्या आणि रहाणीचें मान

( मुंबई येथील रेडिओवर प्रो. काळे ह्यांचें भाषण )

( २ )

### मनुष्यबळाची आवश्यकता

माल्थसचा सिद्धांत अर्थशास्त्रज्ञांनीं सर्वसामान्यपणें मान्य केला आहे. त्यास झालेला व होणारा विरोध मुख्यत्वेंकरून त्यानें धार्मिक कल्पना व भावना ह्यांवर आघात केल्याच्या मुद्यावर आहे. विवाह व संतति हीं धर्ममान्य आहेत एवढेंच नव्हे तर तीं धर्माच्या विधायक आज्ञांवर आधारलेलीं आहेत, ह्यामुळें त्या प्रकरणांत कृत्रिम उपायांचा अवलंब अनिष्ट आहे असें विरोधकांचें म्हणणें होतें व आहे. इंग्लंड व अमेरिका सारख्या देशांत व वसाहतींत लोकसंख्येची वाढ, औद्योगिक प्रगति आणि रहाणीच्या मानांत सुधारणा एकसमयावच्छेदेंकरून होत गेल्यानें आणि प्रगतिपर आणि संघटित राष्ट्रांत उपजीविकेचीं व चैनीचींहि साधनें लोकसंख्या वाढत गेली तरी मिळवण्याची शक्ति असते असें प्रत्यक्ष अनुभवावरून सिद्ध झाल्यानेंहि माल्थसचा सिद्धांत लटपटल्यासारखा दिसूं लागला. राष्ट्राच्या संरक्षणासाठीं व त्याची विजयाकांक्षा तृप्त होण्यासाठीं मनुष्यबळाची जरूर पडते ह्या कल्पनेचा कांहीं राज्यकर्त्यांनीं अलीकडे पुरस्कार केल्याकारणानें विचारप्रवाह माल्थसच्या सिद्धांताच्या उलट दिशेनें वहात आहे. ऑस्ट्रेलियासारख्या वसाहतींत तर माणसांचा तुटवडा असून इंग्लंडमधून लोक तिकडे उत्तेजन देऊन न्यावे लागत आहेत. प्रस्तुत युरोपांत युद्ध चाललें आहे, त्यांत दोस्तराष्ट्रांजवळ लोकसंख्याबळ नसल्यास काय परिणाम होईल ही गोष्ट चिंतनीय आहे. युद्धें राजकीय हेतूनें प्रेरित झालेलीं असतात किंवा कांहीं राष्ट्रांत लोकसंख्या प्रमाणाबाहेर वाढल्यानें तीं अपरिहार्य होतात, असें मानलें तरी पुऱ्या मनुष्यबळाच्या अभावीं लोकांचें स्वातंत्र्यच नष्ट झाल्यास आर्थिक उन्नति व उच्च दर्जाची रहाणी कशी प्राप्त होणार हा विचार येथें मनांत आल्यावांचून रहात नाहीं.

### संततिनियमन

संपत्ति व संतति यांचा परस्पर विरोध आहे आणि दारिद्र्यांच्या कुटुंबांत मुलांचा सुकाळ तर श्रीमंतांस मुलें हवीं असून होत नाहींत असा अनुभव येतो. जेथें खावयास मिळण्याची मारामार तेथें संततीची गर्दी उसळते आणि जेथें खावयास भरपूर तेथें मुलेंबाळें नाहींत अशी विचित्र विधिघटनाच आहे कीं, काय असें वाटावयास लागतें. गरिबांस संततिनियमनाची विशेष जरूर, कारण त्यांची मर्यादित प्राप्ति मुलांबाळांच्या पोषणास अपुरी होऊन त्यांस दुस्थितींत दिवस काढावे लागतात. पाश्चात्य राष्ट्रांत श्रीमान स्त्रीपुरुषांस विवाहबद्ध होऊन संततीची अडगळ आपल्या भोंवतीं उत्पन्न करणें आवडत नाहीं. संततीमुळें स्वातंत्र्य व चैन ह्यांस अडथळा येतो म्हणून विवाहाचें व मुलाचें लोढणें आपणांस नको असें म्हणणाऱ्या स्त्रीपुरुषांची संख्या युरोपांत वाढत आहे. आपल्या मुलांबाळांस चांगलें शिक्षण आणि अवसर मिळावें ह्या हेतुनेंहि कित्येक संततिनियमन कृत्रिम उपायांनीं करतात.

### व्यक्ती विरुद्ध राष्ट्र

युरोपमध्यें कित्येक देशांतील उच्च व मध्यम वर्गांत संतति कृत्रिम उपायांनीं मर्यादित करण्याची प्रथा झपाट्यानें पसरली आहे आणि कनिष्ठ वर्गांतही तिचा प्रसार होत आहे व सहेतुक करण्यांत येत आहे. सध्याचें युद्ध चालू होण्यापूर्वीं संततिनियमनाच्या लोकसंख्येवर होणाऱ्या अनिष्ट परिणामासंबंधानें इंग्लंडमध्यें चर्चा चालली होती आणि लोकसंख्येंत हळुहळू होत चाललेल्या घटीविरुद्ध भयसूचनाही देण्यांत आली होती. प्रस्तुत युद्धाचे परिणाम सर्वच युरोपियन राष्ट्रांस भोगावे लागत असल्यानें आणि स्वसंरक्षणासंबंधीं प्रत्येक देशास मनुष्यबळ अत्यावश्यक असल्याकारणानें संततिनियमनाविरुद्ध चोहोंकडे लोकमत होईल असा संभव आहे. आपला चरितार्थ सुखमय आहे कीं नाहीं, कुटुंबाचा भार सहन करण्याचें सामर्थ्य आपणांत आहे कीं नाहीं आणि बायको व मुलें यांचें जीवन आपणांस सुखाचें करतां येईल किंवा नाहीं याचा विचार करून प्रत्येकानें विवाहाच्या व संततीच्या भानगडींत पडावें ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब असल्यानें समाजास विवाह आणि संतति यांच्या संबंधांत हात घालण्याचें कारण नाहीं असाहि कांहीं लोकांचा युक्तिवाद आहे. रहाणीच्या मानाविषयींच्या आधुनिक व बदललेल्या कल्पनांचा विचार करतां आणि सामान्य जनतेची हलाखीची स्थिति पाहतां जननास आळा घालून मर्यादित लोकसंख्येचें जीवित सुखाचें करण्यासंबंधांतल्या प्रचारास पुष्टि मिळते. जेथें सबंध राष्ट्राच्या संरक्षणाचा व जगण्यामरण्याचा प्रश्न आहे, तेथें संततिनियमनाचें स्वातंत्र्य व्यक्तींस देणें धोक्याचें व अनिष्ट आहे असा युक्तिवाद त्याच्या उलट करण्यांत येत आहे. व्यक्तींमध्यें स्वार्थ व सुखलोलुपता बळावली म्हणजे समाज व राष्ट्र अधोगतीस जाणार असें या युक्तिवादाचें सार आहे आणि प्रस्तुत युद्धानें त्यास दुजोरा मिळत आहेसें दिसतें.

### लोकसंख्या आणि राष्ट्रीय प्रगति

पूर्वीच्या काळीं समाज व राष्ट्र यांचें संरक्षण करण्यासाठीं वाढत्या लोकसंख्येची व तरुण शिपायांची आवश्यकता भासत असे. "अष्टपुत्रासौभाग्यवती भव" असा आशीर्वाद स्त्रियांस देण्यांत येई याचें सामाजिक कारण उघड आहे. आधुनिक काळांत भौतिक शास्त्रांच्या प्रगतीमुळें पाश्चात्य राष्ट्रांत संपत्तीचें उत्पादन व उपयोग झपाट्यानें वाढल्यामुळें व्यक्तिस्वातंत्र्य आणि ऐहिक सुखाची लालसा याविषयींच्या नव्या कल्पना पसरल्या. विवाहाचें व जननाचें लोकसंख्येंतील प्रमाण मृत्युसंख्येबरोबर पाश्चात्य देशांत सारखें उतरत आलें आहे. लोकांचें आरोग्य सुधारण्यानें मृत्युसंख्येचें प्रमाण उतरलें परंतु जननाचें प्रमाणहि कमी झाल्यामुळें लोकसंख्या वाढेनाशी झाली. वस्तुतः लोकसंख्या सारखी वाढत जाणें हें राष्ट्रीय प्रगतीचें निदर्शक समजण्यांत आलें आहे. तिची वाढ खुंटल्यामुळें विचारी लोकांस काळजी उत्पन्न होऊन संतति–नियमनास मर्यादा घालण्याचें महत्त्व ते प्रतिपादूं लागले आहेत. हिंदुस्तानांत जनन व मृत्यु यांचें लोकसंख्येच्या दर हजारीं प्रमाण इतर देशांच्या मानानें मोठें आहे. येत्या शिरगणतींत हिंदी लोकसंख्या गेल्या दहा वर्षांच्या अवधींत ३५–३३ कोटींची ४० कोटीपर्यंत येऊन थडकली असें दिसून येईल असा अंदाज आहे. दर दहा वर्षांनीं जपानच्या सबंध लोकसंख्येइतकी भर हिंदुस्थानच्या लोकसंख्येंत झाली असतां हिंदी राष्ट्रानें ही वाढती संख्या पोसावी कशी ? मनुष्य जन्मास येतो तेव्हां एक तोंड व दोन हात बरोबर घेऊन येतो. पण त्या दोन हातांस एका तोंडास पोसण्याची मारामार पडते. रहाणीच्या मानांत अत्यंत आवश्यक असलेली सुधारणा तर दूर राहिली, पण वाढत्या लोकसंख्येंत आहे तें समाधानकारक रहाणीचें मान तरी कायम ठेवण्यांत येईल काय हा येथें प्रश्न आहे.

### घोड्याच्यापुढें गाडी ?

पाश्चात्य देशांचा इतिहास पाहिला तर प्रगति, शिक्षण, उन्नति व संपत्ति ह्यावरोबर किंवा त्यांच्या मागून संतति-नियमनाच्या कल्पना पसरल्या असें दिसून येईल. तेव्हां हिंदुस्तानांत संतति-नियमन अगोदर चालू करावें म्हणजे रहाणीचें मान प्रत्येक व्यक्तीस संपत्तीच्या विभागणींत अधिक वाटा मिळून सहज सुधारेल. हा युक्तिवाद घोड्याच्यापुढें गाडी उभी करण्यासारखा नाहीं काय ? असा प्रश्न विचारण्यांत येण्यासारखा आहे. शिवाय, संततिनियमनाचे बरेवाईट परिणाम पाश्चात्य राष्ट्रावर काय झाले आहेत आणि त्यांचा त्या संबंधांत अनुभव काय आहे ह्याचा काळजीपूर्वक विचार करून त्याचें अनुकरण करण्याच्या भानगडींत हिंदी लोकांनीं पडावें ही सूचना टाकाऊ आहे असें म्हणतां येणार नाहीं. संततिनियमनाचे मानसिक, शारीरिक व सामाजिक परिणाम काय होतील आणि त्याचे कृत्रिम उपाय ह्या देशाच्या सध्यांच्या स्थितींत कितीसे व्यावहारिक व सोयीस्कर आहेत याचीही शहानिशा होणें अगत्याचें आहे. सामान्य हिंदी जनतेचें दारिद्र्य, हलाखी, अल्पायुष्य, बालमृत्यु इत्यादि अनिष्ट गोष्टींचा प्रतिकार झाला पाहिजे हें निर्विवाद आहे. पण त्याविषयींचे योग्य व अंतीं हितकारक असे उपाय कोणते हें नीट चौकशी व दीर्घ विचार करून ठरविणें अगत्याचें आहे. संततिनियमनाचा उच्चार होतांच तें त्याज्य म्हणून तत्काळ झुगारून देणें जसें अयोग्य आहे, तसेंच तो अचुक इलाज आहे म्हणून त्याचा फैलाव सूक्ष्म विचार न करतां करूं पहाणें घाईचें व अनिष्ट आहे.

(रेडिओ अधिकाऱ्यांचे कृपेनें)

---

## शिवणकामाच्या दुकानांवर निर्बंध घालण्याची आवश्यकता

---

(ले.—श्री. एम्. आर. पराडकर, बी. ए.)

हल्लींच्या काळीं रुबाबदार कपडे असणें हें तरुण पिढीस अति आवश्यक अशी गोष्ट होऊन बसली आहे. म्हणून रुबाबदार कपडे करण्याकरितां एखादा गरीब माणूस ऐपतीबाहेर देखील खर्च करितो; परंतु त्याचा संकल्प पुरा होण्यामध्यें शिंपी आडवा येतो. कारण कोणता शिंपी चांगला आणि कोणता वाईट हें ठरवितांना त्याची मति गुंग होऊन जाते. हल्लीं चोहींकडे असें दिसून येतें कीं, शिवणकामाचीं दुकानें, वकील, हॉटेलें, हेअर कटिंग सलूनें ह्याप्रमाणें गल्लोगल्लीं दिसूं लागलीं आहेत. समाजाची गरज भागविण्याकरितां अशीं दुकानें किंवा कलावंत निघाले तर बरेंच. परंतु फाजील पुरवठा झाल्यामुळें पुरवठा करणारांचा भाव उतरतो. शिवणकामाच्या दुकानांचें असेंच झालें आहे. ह्याला कारण म्हणजे शिवणाचीं दुकानें उघडणें म्हणजे फार सोपें काम होऊन बसलें आहे. एक टेबल, चार खुर्च्या, दोनतीन आरसे व एक कपाट आणि एक मशीन एवढें सामान असलें कीं दुकान उघडतां येतें. भपका बराचसा केल्यास गिऱ्हाईक येतें पण कामगारवर्ग जर तज्ज्ञ नसला तर कपडे मनपसंत शिवले जात नाहींत. एवढेंच नव्हे तर अंगाला मुळींच न बसणारे, किंवा अंगांत कांहींतरी डगला घातल्यासारखे दिसणारे असे कपडे शिवले जातात. गुंड्यांची भोकें चार तर गुंड्या तीन, एक बाही लांब किंवा एक बाही अखूड, कांहीं कल्पनेपेक्षा एकदम कमी, खिशांच्या टिपा किंवा किनारीच्या टिपा वाकड्या तिकड्या मारलेल्या, असे कसेतरी कपडे शिवलेले मिळतात. तेसुद्धां कोर्टाच्या तारखा ज्याप्रमाणें पुढें ढकलत ढकलत जाऊन पुढें केव्हां तरी निकाल होतो त्याप्रमाणें कोणत्या तरी दिवशीं मिळतात. याला कारण बहुंशीं कटर किंवा शिवणारे वाकबगार नसणें हें होय. कामगारांच्या कच्चेपणामुळें रेशमी, गरम, किंवा महागाईचें कापड नासलें जातें. ह्याला जबाबदार कोण ?

इतर दुकानांत आपल्याला जसा माल हवा तसा अगोदर पसंत करतां येतो किंवा एखाद्या कलावंताची निपुणता त्याच्या जवळ असलेल्या प्रशस्तिपत्रकांवरून ठरवितां येते. एखाद्या गायकाची गाननिपुणता फोनोमधून किंवा रेडियोमधून ऐकून किंवा प्रत्यक्ष बैठकींत ऐकून कळून येते. ज्या ज्या परिक्षाबाबत डिग्र्या दिल्या जातात त्यावरून त्या डिग्रीधारण करणाराची किंमत किंवा लायकी ओळखतां येते. परंतु शिवणकामासारखे कांहीं धंदे असे आहेत कीं त्यांत दुकानदार कसें काम करितात ह्याचें प्रशस्तिपत्रकहि नसतें आणि त्यांच्या कामाचें नमुनहि तयार नसतात. जरी नमुने तयार असले तरी प्रत्येक माणसाचा शारीरिक आकार कांहीं प्रमाणशीर नसतो. म्हणून आपला कपडा चांगला होतो का वाईट होतो हें आपल्याला येणाऱ्या अनुभवावरच अवलंबून राहणार.

अशा तऱ्हेची गिऱ्हाइकांची नुकसानी होऊं नये किंवा त्यांनीं असंतुष्ट राहू नये म्हणून शिवणकामाचें दुकान उघडणारावर कांहींतरी कायद्याचें बंधन घालावें. त्याची रूपरेषा स्थूलमानानें अशी असावी. कटर हा एखाद्या सरकारमान्य संस्थेमधून पास झालेला असावा किंवा त्याजपाशीं लंडन डिप्लोमा असावा. त्यानें लंडन डिप्लोमा किंवा सरकारी डिप्लोमा असलेल्या कटर्सच्या, दहा वर्षें अस्तित्वांत असलेल्या दुकानांत उमेदवार म्हणून पांच वर्षें काम केलेलें असावें. या प्रमाणें उमेदवारी केल्यावर दुकानें उघडल्यास पांच वर्षांनंतर तीं दुकानें उमेदवार घेण्यास लायक समजावींत. अशा दुकानांना मान्यतेचें सर्टिफिकेट द्यावें. आतांपर्यंत जीं दुकानें १५ वर्षें चाललीं आहेत व प्रांतीवरील कर भरीत आहेत अशांसहि मान्यता द्यावी पण यापुढें मान्यता मिळविण्याकरितां दुकानाच्या चालकांना लंडन किंवा सरकारी डिप्लोमा मिळावयास पाहिजे आणि त्यांनीं वर दर्शविल्याप्रमाणें उमेदवारी केली पाहिजे. यापुढें शिवणकामाचें दुकान उघडण्यास सरकारी परवाना देण्याची पद्धत पाडावी. ज्या माणसानें कमींत कमी एखाद्या दुकानांत ५ वर्षें काम केलें असेल—सतत ५ वर्षें नसले तरी चालेल,—त्यासच परवाना द्यावा. परवाना मिळाल्यानंतर त्या दुकानास मान्यतेचे सर्व नियम लागू राहतीलच. कायद्यानें दुकान उघडण्याची जरी कोणाला बंदी करतां आली नाहीं, तरी वरीलप्रमाणें बंधनें घातल्यास लोकांना आपले कपडे बिघडवून घेण्याचे किंवा नासवून घेण्याचे प्रसंग फारसे येणार नाहींत, लोकांना वाकबगार टेलर्स कोण, गैरवाकबगार कोण हें समजेल व जो उठतो तो शिवणकाम चांगलें न येतां दुकान काढतो त्यास आळा बसेल व गिऱ्हाइकांचें नुकसान होणार नाहीं.

हल्लीं इंग्लंडमध्यें कांहीं टेलरिंग फर्म्सना अशी मान्यता दिलेली आहे आणि त्यांचीं नांवें सरकारांत नोंदून ठेवलेलीं आहेत. त्यांच्याकडेच मिलिटरी लोकांकडचें काम जावें असा अभिप्रेत अर्थ आहे. आतां लढाईच्या ऐन दंगलींत इतर दुकानांनाहि काम मिळेल ती गोष्ट वेगळी. जर्मनीमध्यें चांगल्या टेलरला कितीतरी वर्षांची तयारी लागते.

आपल्याकडे अशा तऱ्हेवर मान्यतेची पद्धत पाडली तर सरकारी कामें कोणास द्यावीं हा प्रश्न फारसा पडणार नाहीं. पोस्टाचे शिपाई, रेल्वेचा कामगारवर्ग, सैनिक, विमान या खात्यांतील लोक, बँडवाले, मोटरड्रायव्हर्स, पोलिस शिपाई या सर्वांचे कपडे अशा मान्यता पावलेल्या फर्म्समधून केले जावेत आणि हिंदुस्थानांतील सर्व खात्यांतील व संस्थांतील सर्व कपडेहि अशा मान्यता पावलेल्या फर्म्समधूनच केले जावेत अशी जोराची मागणी करतां येईल.

## ब्रिटिश हिंदुस्थानांतील बिगर-शेड्यूल्ड बँका

३१ डिसेंबर, १९३८ रोजीं, शेड्यूल्ड बँका वगळून ब्रिटिश हिंदुस्थानांत एकूण १,४२१ बँका काम करीत होत्या. त्यांपैकीं ९८८ बंगालमध्यें, २५२ मद्रासमध्यें, ५२ आसाममध्यें, ४० संयुक्त प्रांतांत, ३६ पंजाबांत आणि २६ मुंबई प्रांतामध्यें नोंदलेल्या होत्या. ह्या ९८८ पैकीं फक्त ४५% बँका कंपनी ॲक्टाच्या २७७ एल् कलमाप्रमाणें तक्ते भरून पाठवीत, असें आढळून आलें.

### भांडवल आणि रिझर्व्ह

वरील १,४२१ बँकांपैकीं २३६ बँकांचें भरणा झालेलें भांडवल आणि रिझर्व्ह मिळून प्रत्येकीं रकम ५० हजार रुपयांवर भरली. बाकीच्या १,१८५ बँकांचें भांडवल आणि रिझर्व्ह त्यापेक्षा कमी होतें. ५० हजारांवरील २३६ बँकांपैकीं शेड्यूल्ड बँकांचे यादींत जाण्यास लायक इतक्या भांडवलाच्या फारच थोड्या बँका आढळतात. ह्या बँकांची वर्गवारी खालील तक्त्यांत दिली आहे:—

५० हजारांपेक्षां अधिक भांडवल आणि रिझर्व्ह असलेल्या बँका

| प्रांत | ५० हजार ते १ लक्ष रु. | १ लक्ष ते २ लक्ष | २ लक्ष ते ३ लक्ष | ३ लक्ष ते ४ लक्ष | ४ लक्ष ते ५ लक्ष | एकूण बँका |
|---|---|---|---|---|---|---|
| आसाम | ४ | ३ | — | — | — | ७ |
| बंगाल | ५० | १४ | — | २ | १ | ६७ |
| बिहार | १ | — | १ | — | — | २ |
| मुंबई | ४ | ३ | २ | — | — | ९ |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | १ | ३ | — | — | — | ४ |
| मद्रास | ५३ | ३३ | १२ | ५ | ६ | १०९ |
| पंजाब | १० | ७ | २ | १ | — | २० |
| सिंध | २ | — | — | — | — | २ |
| संयुक्त प्रांत | ७ | ४ | १ | — | १ | १३ |
| ओरिसा | १ | — | — | — | — | १ |
| सरहद्द प्रांत | — | १ | — | १ | — | २ |
| एकूण | १३५ | ६५ | १७ | १० | ९ | २३६ |

५० हजारांपेक्षा कमी भांडवल आणि रिझर्व्ह असलेल्या बँकांची वर्गवारी येथें दिली आहे:—

५० हजारांपेक्षा कमी भांडवल आणि रिझर्व्ह असलेल्या बँका

| प्रांत | ५ हजारांपेक्षा कमी | ५ ते १० हजार | १० ते २० हजार | २० ते ३० हजार | ३० ते ४० हजार | ४० ते ५० हजार | ५० ह. खालीं (तपशील माहीत नाहीं) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आसाम | १७ | ११ | ९ | ४ | २ | १ | १ | ४५ |
| बंगाल | २०९ | १९१ | १७९ | ८३ | ३५ | ३४ | ९२ | ९२१ |
| बिहार | १ | १ | १ | २ | १ | — | १ | ७ |
| मुंबई | ५ | ३ | ७ | २ | — | — | — | १७ |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | — | — | — | — | — | — | — | — |
| मद्रास | ३३ | २२ | ३५ | २७ | १९ | १४ | ३ | १४२ |
| पंजाब | ७ | १ | ४ | ३ | — | १ | — | १६ |
| सिंध | १ | — | २ | १ | — | — | — | ४ |
| संयुक्त प्रांत | १४ | ४ | ९ | ४ | १ | — | २ | २७ |
| ओरिसा | — | — | १ | — | — | — | १ | २ |
| सरहद्दप्रांत | — | — | — | — | — | — | — | — |
| अजमीर-मारवाड | — | १ | — | — | — | — | — | १ |
| दिल्ली | — | १ | — | — | — | — | — | १ |
| एकूण | २७० | २३६ | २३७ | १२६ | ५८ | ५० | १०१ | ११८५ |

वरील दोन तक्त्यांवरून असें दिसून येतें कीं, बिगर-शेड्यूल्ड बँकांजवळ भांडवल आणि गंगाजळी फार लहान आहे. पहिल्या तक्त्यांतील बँकांबाबत त्याची सरासरी १ लक्ष ३२ हजार रुपये आणि दुसऱ्या तक्त्यांतील बँकांबाबत त्याची सरासरी १२ हजार रुपये पडते. कांहीं बँकांचें भांडवल १०० रुपये सुद्धां नाहीं. कांहीं लहान बँकांचे रिझर्व्ह फंडहि अत्यंत अपुरे असतात.

### कायम आणि चालू ठेवी

मुंबई, सिंध, सरहद्दप्रांत हे प्रांत वगळले तर बाकीच्या प्रांतांत बँकांतील कायम ठेवींचें चालू ठेवींशीं प्रमाण २:१ ह्यापेक्षा अधिक पडतें. बंगाल, मद्रास आणि पंजाब येथें तर हें प्रमाण ह्याहिपेक्षा ज्यास्त आहे. कांहीं बँकांजवळ चालू ठेवी अजीबात नाहींत. प्रत्येक बँकेकडील कायम ठेवींची सरासरी रकम १ लक्ष, ८५ हजार रुपये आणि चालू ठेवींची सरासरी ६१ हजार रुपये अशी आहे. ह्याचा अर्थ, वरील बऱ्याचशा संस्था खऱ्या बँका नसून केवळ सावकारी करणाऱ्या दीर्घ मुदतीच्या ठेवी घेणाऱ्या संस्था आहेत.

### रकमा कशा गुंतवितात ?

बहुतेक बँका आपल्याजवळ पुरेसे पैसे रोख बाळगतात, परंतु त्या आपला फारच थोडा पैसा सरकारी रोख्यांत गुंतवितात. कित्येक बँकांचेपाशीं सरकारी रोखे अजीबातच नसतात. त्यांचा बहुतेक पैसा कर्जांत गुंतलेला असतो. ह्याचा परिणाम असा होतो, कीं त्यांस अडीअडचणीस उपयोगी पडण्याजोगी तरतूद कांहींहि नसते. त्यांच्या बहुतेक ठेवी दीर्घ मुदतीच्या असतात, ही गोष्ट वेगळी. ब्रिटिश बँका आपल्या पैशांपैकीं १०% रकम रोख बाळगतात, ५ ते ६% रकम कॉलमनींत गुंतवितात, १५% रकम हुंड्या आणि ट्रेझरी बिलें ह्यांत गुंतवितात, ३०% रकम सरकारी कर्जरोख्यांत घालतात आणि ४०% रकम कर्जाऊ देतात. त्यांच्या एकूण भरणा झालेल्या भांडवलाचें आणि गंगाजळीचें एकूण ठेवींशीं प्रमाण ६% पडतें. हिंदुस्थानांतील शेड्यूल्ड बँका १३% रकम रोख ठेवतात, ६% हुंड्यांत गुंतवितात, ५०% रकम सरकारी रोख्यांत ठेवतात, आणि ४०% रकमेचीं कर्जें देतात. त्यांच्या एकूण भरणा झालेल्या भांडवलाचें आणि गंगाजळीचें एकूण ठेवींशीं प्रमाण १३% पडतें. बिगर शेड्यूल्ड बँकांचें भांडवल आणि गंगाजळी यांचें एकूण ठेवींशीं प्रमाण २१·३% पडतें; त्या बँका १३% रकम रोख बाळगतात, १९% रकम रोख्यांत गुंतवितात आणि ८९% रकमेचीं कर्जें देतात.

### तोट्यांत चालणाऱ्या बँका

मद्रास प्रांतांतील १९५ बँकांनीं आपले बॅलन्सशीट दाखल केले, त्यांपैकीं १७२ बँकांनीं नफा दाखविला. बंगालमधील १२८ बँकांच्या बॅलन्सशीटपैकीं ९२ बॅलन्सशीटमध्यें तोटा दिसून येतो. मुंबई प्रांतांतील १२ बँकांपैकीं ४ बँकांनीं तोटा दाखविला त्याचें कारण प्राथमिक खर्च हें मुख्यत: होतें. इतर प्रांतांचे मानानें मुंबई प्रांतांत बँकांची संख्या अल्प आहे.

### शाखा

बहुतेक बँकांस स्वत:च्या शाखा नाहींत. कांहीं थोड्या बँकांच्या प्रत्येकीं बऱ्याच शाखा आहेत, परंतु त्या बहुतेक त्या त्या प्रांतांतच आहेत. १० बँकांच्या २९ शाखा त्यांचे प्रांतांबाहेर आहेत, त्या शेजारच्याच प्रांतांत असलेल्या आढळतात.

## पश्चिम ठाणा आणि मुंबई उपनगर जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि., पालघर.

शेतकऱ्यांचें कर्जनिवारण ही एक महत्वाची राष्ट्रीय बाब आहे. केवळ हिंदुस्थानच नव्हे तर जगांतील कोणतेंही राष्ट्र घेतलें तरी तेथील शेतकरी हा प्रायः कर्जापायीं शिणलेला दिसेल. शेती हा धंदा जरी यांत्रिक उद्योगधंद्याच्या वर्गांत मोडत नाहीं तरी कोण त्याही उद्योगधंद्यास लागणारी भांडवल आणि मजुरी हीं जीं मुख्य जरूरीचीं साधनें तीं शेतीच्या धंद्यास तितक्याच जरूरीचीं आहेत. शेतकऱ्याचें शेत हें त्याचें भांडवल होय आणि पीक पिकविण्यास लागणारी मेहनत यांत मजुरीचा अंतर्भाव होतो. आज जगांत आपण पहातों कीं शेतीची सुधारणा आणि शेतीची मोठ्या प्रमाणावर मशागत इकडे स्वतंत्र राष्ट्रें अधिकाधिक भर देत आहेत. अशा परिस्थितीमध्यें हिंदुस्थानचा शेतकरी हा त्याच्या कर्जाच्या भाराखालीं वाकलेला दिसत आहे. त्यांतच हिंदुस्थानचा पाऊस हा अनियमीत असल्यामुळें शेतीचें उत्पन्नही अनियमीत राहातें आणि त्यामुळें शेतकऱ्यांची कुचंबणा होण्यास भर पडते. तेव्हां शेतकऱ्यांची स्थिती सुधारावयाची म्हणजे धूर्त व भरमसाट व्याजखाऊ सावकारांपासून त्याची सुटका करणें हेंच आद्य व सर्वश्रेष्ठ कर्तव्य होय. शेतकऱ्याचें एकमेव भांडवल जें त्याचें शेत तें सुरक्षित ठेऊन त्याची कर्जातून मुक्तता करण्यास जमिनींच्या तारणावर कर्जे देणारी लँड मॉर्गेज बँक ही या कामीं अनुभवानें उत्तम ठरलेली संस्था होय. या ठिकाणीं शेतकऱ्याची जमीन पूर्ण निर्धास्त राहील व शेंकडा ६ टक्के इतक्या कमी दराच्या व्याजानें व पंधरा ते वीस वर्षांच्या लांब मुदतीच्या परतफेड करण्यास सोयीच्या हप्त्यांनीं कर्जे देण्यांत येतील. मात्र ज्या जमिनी बँकेस तारण द्यावयाच्या असतील त्या कर्जदाराच्या निर्वेध मालकीच्या असल्या पाहिजेत. तसेंच त्या सावकारांकडे नजरगहाण अगर मुदतखरेदीच्या रूपानें गहाण असल्यास सावकाराच्या बोजांतून त्या सोडवितां येतील व त्या बँकेकडे तारण राहतील. कर्जदार हा प्रामाणिक असल्याची खात्री बँकेस झाली पाहिजे व त्यांच्या एकंदर कुटुंबाचा खर्च भागून त्याच्या मिळकतींतून बँकेचे हप्ते तो नियमीतपणें फेडूं शकतो असेंही सिद्ध झालें पाहिजे. जमिनीची किंमत ठरवण्याकरतां बँकेचे सरकारनियुक्त अंमलदार जमिनीची प्रत्यक्ष पहाणी करतील व बाजारभाव, शेतसारा, शेतांतील उत्पन्न या सर्व बाबी विचारांत घेऊन योग्य ती किंमत ठरवितील. या किंमतीच्या ज्यास्तींत ज्यास्त निम्म्यानें शेतकऱ्यास कर्ज देण्यांत येईल. लँड मॉर्गेज बँक ही सहकारी कायद्याखालीं सरकारमध्यें रजिष्टर झाली असून तिचे हिशेब सरकारी ऑडिटरकडून दरवर्षी तपासण्यांत येतात. यामुळें हिशेबांत बिनचूकपणा राहतो व कोणत्याही प्रकारच्या लबाडीस वाव रहात नाहीं. म्हणून बँकेशीं व्यवहार करणें हें प्रत्येक शेतकऱ्यास परिणामीं हितावह होतें. कर्ज फेडण्याची लांब मुदत व घावें लागणारें कमी व्याज इकडे लक्ष देतां शेतकऱ्यास मदत करणारी अशी संस्था दुसरी कोणतीही नसल्याचें त्यांना दिसून येईल.

ही झाली शेतकऱ्यांची व ज्यांना बँकेकडून प्रत्यक्ष कर्ज पाहिजे अशांची गोष्ट. परंतु देशांतील धनिक वर्गास बँकेंत आपला पैसा गुंतविणें फायद्याचें तसेंच शेतकऱ्यांस त्यांच्या हलाकीच्या स्थितींतून वर काढण्याच्या कामीं हातभार लावण्याच्या सतकार्याचें आहे. ज्या जमिनींच्या तारणावर पैसे देण्यांत येतात त्यांच्या किंमती कसोशीनें व सर्व व्यवहार सरकारी नियंत्रणाखालीं होत असल्यामुळें धनिक लोकांचे पैसे बँकेंत सुरक्षित राहतील. तसेंच ही बँक इलाख्याच्या लँड मॉर्गेज बँक मुंबई इजकडून आपल्या कर्जदारास देण्याच्या रकमेचें कर्ज घेत असल्यामुळें इलाखा बँकेचेंही इकडे पूर्ण लक्ष असतें. सदर इलाखा बँकेनें जें लाखों रुपयांचें भांडवल उभें केलें आहे त्याच्या मुद्दलाची आणि व्याजाची जोखीम सरकारनें घेतली आहे. अशा रीतीनें पैसे गुंतविल्यास त्यांना योग्य नफा अगर व्याज मिळूं शकेल आणि देशांतील गरजू शेतकऱ्यांस मदत केल्याचें श्रेयही मिळेल.

पश्चिम ठाणा व मुंबई उपनगर जिल्हा याकरितां अशी बँक सरकारनें नुकतीच रजिष्टर केली असून तिचा व्यवहार पालघर येथें सुरू झालेला आहे. बँकेच्या कार्यक्षेत्रांत सर्व उपनगर जिल्हा व ठाणे जिल्ह्यापैकीं उंबरगांव पेटा, डहाणू तालुका, वाडा पेटा, पालघर तालुका आणि वसई तालुका यांचा अंतर्भाव होतो. तरी सदर बँकेचा फायदा शेतकरी तसेंच श्रीमंत लोक घेतील अशी आशा आहे.

बँकेबद्दल कांहीं माहिती पाहिजे असल्यास ती मॅनेजर, ठाणा वेस्ट ॲन्ड बॉम्बे सबर्बन डिस्ट्रिक्ट्स् को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि. पालघर यांजकडे पत्रव्यवहार करावा अगर समक्ष भेटावें.

विष्णु वामन दांडेकर
चेअरमन

### युद्धामुळें मालांच्या किमतींत वाढ

युरोपमधील युद्धाची सर्व जगाला झळ लागली असून सर्वत्र मालांच्या किमतींत बेसुमार वाढ होत आहे. गहूं, मका, कापूस, कॉफी, चहा, साखर यासारख्या रोज लागणाऱ्या जिनसा दिवसेंदिवस महाग होत आहेत. इतर जिनसांत ज्यूट ८४ टक्के, कच्चें रेशीम २६, लोकर १४, कातडें ५२, रबर २५, लाख ६८, ताग १६, कथील १४, शिसें ९, जस्त ३७, कोळसा ११, पेट्रोल २४, व चांदी १-३ टक्याप्रमाणें वाढ झाली आहे. पेट्रोल व चांदी यांच्या किंमतींत चढउतार होत आहे.

#### धातूंचे उत्पादनांत वाढ

युद्धाचा दुसरा परिणाम म्हणजे कोळसा, लोखंड, पोलाद वगैरे धातूंच्या उत्पादनांतील वाढ. अमेरिकेंत नेहमीपेक्षा २८ टक्के कोळसा अधिक निघत आहे. लोखंड अमेरिकेंत ३४ टक्क्यांनी वाढलें पण बेलजम व स्वीडनमध्यें अनुक्रमें २६ व १५ टक्क्यांनी कमी झालें. पोलाद अमेरिकेंत ३९ टक्यांनी वाढलें, उलट बेलजम व स्वीडनचें प्रमाण कमी झालें. कथील पेरूंत एका महिन्यांत ९०० टनांनी वाढलें व त्याच महिन्यांत युगोस्लाव्हियांत २०० टनांनी कमी झालें. शिसें मात्र अमेरिकेंत कमी झालें पण मेक्सिको व ब्रह्मदेशांत वाढ झाली. जस्त ३ महिन्यांत १०,००० टनांनी वाढलें व हा सर्व नफा अमेरिकेनें मिळवला. टिनचे आंकडेही असेच उद्बोधक आहेत. सारांश, युरोपमधील राष्ट्रें आपआपसांत लढून अमेरिकेसारख्या राष्ट्राची भर करीत आहेत.

#### औद्योगिक उत्पादन

अमेरिकेंत १५ टक्यांनीं औद्योगिक उत्पादन वाढून १९२९ ची सरासरी आतां गांठली गेली आहे. युरोपियन राष्ट्रांपैकीं नार्वेची ५ टक्यांनीं वाढ झाली तर डेन्मार्क व स्वीडनची अनुक्रमें १ व २ टक्यांनीं घटली. गव्हाची अमेरिकेंत १९ व आस्ट्रेलियांत १७ टक्यांनीं वाढ झाली. जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, रुमानिआ, युगोस्लाव्हिया वगैरे राष्ट्रांच्या उत्पादनांत थोडी वाढ झाली आहे. मक्याची वाढ गव्हाप्रमाणेंच आहे.

## जपानमधील आर्थिक परिस्थिति

“सन १९२१ च्या मंदीच्या वर्षांचे मानानें इतर देशांतील आर्थिक परिस्थिति ज्या मानानें सुधारली आहे, त्यापेक्षा जपानमधील आर्थिक परिस्थिति अधिक झपाट्यानें सुधारली आहे. इतर देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नांत गेल्या दहा वर्षांत भर पडली नाहीं, तथापि जपानचें राष्ट्रीय उत्पन्न ९०% वाढलें. मँच्युरिआ प्रकरण; आर्थिक मंदी; भांडवल, बाजारभाव, उत्पादन, इत्यादींवरील सरकारी नियंत्रण हीं सर्व कारणें उद्योगधंद्यांच्या वाढीस प्रतिकूल असलीं तरी उत्पादन आणि व्यापार हीं वाढत आहेत. कारखान्यांचें उत्पादन ह्या मुदतींत १४०% वाढलें. कपास काढण्याच्या उत्पादनाशीं यंत्रसामुग्री, रसायनें इत्यादींचें उत्पादन बरोबरी करूं लागलें आहे. १९२९ ते १९३८ ह्या मुदतींत जागतिक व्यापारांत ३१% घट झाली; जपानचा निर्गत व्यापार २३% आणि आयात व्यापार २२% वाढला. जुलै, १९३७ पासून चीन-जपान युद्ध सुरू आहे, त्याकरितां जपानी सरकारास मोठें कर्ज उभारावें लागलें, त्याचा पैशाचे बाजारावर प्रतिकूल परिणाम झालेला नाहीं आणि उद्योगधंद्यांच्या वाढीस पुरेसें भांडवल उपलब्ध आहे. बाजारभाव थोडे चढले असले तरी हुंडणावळ कायम राखण्यांत अडचण आली नाहीं. जपानी सरकार आणि जपानी कारखानदार व व्यापारी ह्यांच्या सहकार्यानें आर्थिक घडी नीट बसविण्यांत आली आहे. मँच्युक्युओ-मोंगोलिअन सरहद्दीवरील लष्करी चकमकी थांबविण्याचें जपानी आणि रशियन सरकारनें १६ सप्टेंबर, १९३९ रोजीं ठरवलें. प्रस्तुत करारामुळें ह्या दोन देशांस आपलीं आर्थिक आणि राजकीय नातीं नवीन पायावर सुदृढ करतां येतील. चीनमध्यें शांतता नांदली म्हणजे त्या देशाची क्रयशक्ति सुधारून तो इतर देशांस कच्चा माल पुरवूं लागेल. त्यामुळें सबंध जगाचाच फायदा होईल. आयात मालाच्या उठावावर जपानमध्यें आज बंधनें घालणें आवश्यक झालें आहे, परंतु चीनचा प्रश्न सुटला आणि युरोपांतील युद्धामुळें जपानचा निर्गत व्यापार वाढला, म्हणजे हें नियंत्रण कमी करण्यांत येईल. गेल्या महायुद्धाचे वेळीं जपानला जशी सुवर्णसंधी मिळाली आणि तिचा तिला फायदा मिळाला, तसा सध्यांच्या युद्धापासून मिळेल असें वाटत नाहीं. तथापि, जपान, चीन आणि मँचुरिया ह्यांच्या परस्पर सहकार्यानें पूर्व आशियांत सुबत्ता नांदूं शकेल ह्या दृष्टीनें प्रयत्न करणें आपलें काम आहे.”:—सोवन यामामूरो, मित्सुबिशी ट्रस्ट कंपनी आणि मित्सुबिशी इकनॉमिक रिसर्च ब्यूरो ह्यांचे अध्यक्षांनीं रेडिओवरून परराष्ट्रांतील लोकांसाठी केलेल्या भाषणाचा सारांश.

---

## पोस्टल सेव्हिंग बँकांचे नवीन नियम

पोस्ट ऑफिस सेव्हिंग बँकांत खातीं उघडण्याबाबत आणि त्यांत पैसे ठेवणें आणि काढणें ह्या संबंधांत हिंदुस्थान सरकारनें नवीन नियम केले आहेत, ते १ ऑगस्ट १९४० पासून अंमलांत येतील.

(१) नवीन खातें उघडतांना किमान २ रुपये ठेवले पाहिजेत. पुढें प्रत्येक वेळीं एक अगर अधिक रुपये ठेवले पाहिजेत; आणे पै स्वीकारण्यांत येणार नाहींत.

(२) पैसे काढतांनाहि एक रुपया अगर अधिक रुपये काढले पाहिजेत; आणे-पै काढतां येणार नाहींत. खातें बंद करते वेळीं अर्थात् आणे-पै मिळतील. प्रत्येक खात्यांत किमान २ रुपये शिल्लक पाहिजेत.

(३) अज्ञान मुलाचे नांवानें दोहोंपेक्षा अधिक खातीं उघडतां येणार नाहींत.


स्पृहणीय यश

बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवा. र्षिक-दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच “ कॉमनवेल्थ ” ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स

कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल्. बी.

मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे

★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस

★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें

सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.

रजिस्टर्ड ऑफिस : ७१४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस : ११२A सदाशिव पुणें २

न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

Examiner Press Building, Dalal Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.

Photographic Dealers

POONA.

सुखाचा शोध

मिनर्व्हा १४ वा आठवडा

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% करमाफ लोन ( १९४५-५५ ) | ११०—७ |
| ५% ( १९४०-४३ ) लोन | १०१—१४ |
| ४% १९४३ | १०४—२ |
| ३½% बिनमुदत | ९०—१० |
| ३½% १९४७-५० | १००—८ |
| ३% ( १९६३-६५ ) | ८८—६ |
| २¾% १९४८-५२ | ९३—६ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०१—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १००—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) | १०७—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | ११७—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% | १३९—० |
| बँक ऑफ बडोदा (१००—५०) १०% | १००—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% | ३५—० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५३०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०७—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | १३१—८ |
| कराची ( १०० ) ९% | १८३—२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३४०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १४७५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४¾% | ९५—८ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ३½% | ६७—० |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) १२½% | ९८५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७६३—१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | २३२—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. | ५०—० |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. | २२—४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. | ३८—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४१५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | १९०—१० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १३८—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३८९—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै. | २११०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु | १२६—८ |





एजंटः—

**महादेव गोविंद कुलकर्णी**

किराणा व भुसार मालाचे व्यापारी

७८६ सदाशिव पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

**जर्निमन टेलर व्हा.**

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

**पराडकर टेलर्स ॲकेडिमी**, ६७१ सदाशिव, पुणें.

हप्त्याचे अत्यंत कमी दर असलेल्या

**दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल अॅशुअरन्स कं. लि.**

ह्या महाराष्ट्रीय विमा संस्थेचा पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा निर्णय

हयातींतील विम्यावर दर हजारीं ५०

हेड ऑफिस : जळगांव ( पू.खा. )

मुंबई शाखा : को-ऑपरेटिव्ह बिल्डिंग, फेरोजशा मेथा रोड.

हयातीनंतरच्या विम्यावर दर हजारीं ६०

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its,

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**

**Last year 1937-38**

**Exceeds**

**Rs. 3 CRORES**

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

**On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 1CC, Budhwar Peth

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.

## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ६००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

फर्म, कंपनी, सोसायटी

## कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल. बी.

"न्यायबोध"या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ८६ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,
तुळशीबागरोड :: नागपूर शहर

## विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ र्‍या वर्षास सुरुवात. केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.

व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.




## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाहणीवरून तयार केलेलें असून आज सतत १० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, होणें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

श्री हंसो फॉरिन कन्सर्न्स ( रजि. नं. १ )
१५३।१ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. धोंडो वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.